<u>**असुधारित प्रत**</u>

# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक ५ ऑगस्ट, २०१६

## (सकाळी १०.०० ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत)

**(गुरुवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २५९ अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री.धनंजय मुंडे,** नारायण राणे, सुनील तटकरे, शरद रणपिसे, हेमंत टकले, माणिकराव ठाकरे, किरण पावसकर, अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री.संजय दत्त, जयंत पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री.जनार्दन चांदूरकर, सतीश चव्हाण, अमरनाथ राजूरकर, आनंद ठाकूर, आर्कि. आनंदराव गाडगीळ, श्री.अनिल भोसले, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री. जयवंतराव जाधव, सुभाष झांबड, जगन्नाथ शिंदे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, ॲड. राहुल नार्वेकर, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री.नरेंद्र पाटील, चंद्रकांत रघुवंशी, संदिप बाजोरिया, ॲड.रामहरी रुपनवर, प्रकाश गजभिये, श्रीमती हुस्नबानू खलिफे, सर्वश्री.ख्वाजा बेग, हरिसिंग राठोड, विक्रम काळे, रामराव वडकुते, ॲड. जयदेव गायकवाड, **वि.प.स. यांचा म.वि.प.नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव — (चर्चा व मंत्र्यांचे उत्तर) -**

"देशाची आर्थिक राजधानी तथा महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबई शहरात महानगरपालिकेतर्फे करण्यात येणाऱ्या विविध कामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला असणे, मनपाच्या विविध विभागातील नालेसफाई, मीठी नदीचा गाळ काढणे, रस्ते, आरोग्य, शिक्षण यासह सर्व विभागात निकृष्ट दर्जाची कामे व भ्रष्टाचार झालेला असणे, अनेक विभागात कामे देताना व करताना भ्रष्टाचार झाल्याचे उघड होणे, शहरात कचऱ्याची विल्हेवाट योग्य पध्दतीने लागत नसणे, डंम्पींग ग्राऊंडच्या कामात होत असलेला विलंब व भ्रष्टाचार, भुयारी गटारे व डंम्पींग ग्राऊंडच्या कामात कन्सल्टींगमध्ये झालेली पैशांची उधळपट्टी, होत असलेला विलंब व भ्रष्टाचार, स्मार्ट सिटीची फसवी घोषणा, मनपातील इमारत प्रस्ताव विभागातील व प्रभागातील इमारत बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने विकासकांकडून ओसी घेतल्यावर अनधिकृत बांधकाम केले जाणे, मुंबईचा नवीन विकास आराखड्यामध्ये बिल्डरांचे हित लक्षात घेऊन सूचविलेले बदल ना विकास क्षेत्रात गृहनिर्माणासाठी एफ.एस.आय. देण्याचे प्रस्ताव, एकाच पक्षाची अनेक वर्षे सत्ता असल्याने मनमानी व भ्रष्टाचारी कामामुळे नागरी सुविधांवर होणारा परिणाम, त्यामुळे मुंबईची भकास झालेली अवस्था, ठाणे शहरातही अशीच अवस्था असणे, होर्डींग पॉलीसी व फायर पॉलीसीचे होत असलेले उल्लंघन,

मुंबईतील गगनाला भिडणारी महागाई, गृह खरेदी सर्वसामान्यांच्या आवाक्या बाहेर जाणे, परवडणाऱ्या घरांबाबत शासनाकडून फसव्या घोषणा करण्यात येणे, म्हाडाच्या मोकळ्या भुखंडावरील वाढती अतिक्रमणे, नवीन गृहनिर्माण अधिनियम लागू करण्यात होणारा विलंब, राज्याचा गृहनिर्माण अधिनियम डावलून केंद्राचा रिअल इस्टेट ॲक्ट, २०१६ स्विकारणे, राज्यातील मंदावलेले औद्योगिकीकरण, शासनास गुंतवणूक आकर्षित करण्यास आलेले अपयश, औद्योगिक गुंतवणूकीबाबत स्पर्धेत अनेक राज्ये महाराष्ट्र राज्याच्या पुढे जाणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(दुपारी १.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(क)** मंगळवार, दिनांक १९ जुलै, २०१६ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप व इतर वि.प.स. यांचा "**संग्रामपूर (जि.बुलढाणा) व तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील शेतकरी सिंचनाच्या लाभापासून वंचित असल्याबाबत**" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २०५९१.

**(ख)** मंगळवार, दिनांक १९ जुलै, २०१६ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्रीमती विद्या चव्हाण व इतर वि.प.स. यांचा "**राहूरी (जि.अहमदनगर) येथील महात्मा फुले कृषि विद्यापीठात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्याबाबत**" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २१८९८.

**(ग)** शुक्रवार, दिनांक २९ जुलै, २०१६ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्री.राजेंद्र जैन, वि.प.स. यांचा "**गोंदिया जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षकांना वेतन मिळणेबाबत**" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २१९२०.

**(घ)** बुधवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पुढे ढकलण्यात आलेला प्रा.जोगेन्द्र कवाडे, वि.प.स. यांचा "**खार-सांताक्रुझ (पूर्व) मुंबई येथील गृहनिर्माण सोसायट्यांचा पुनर्विकास प्रलंबित असल्याबाबत**" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक १९५१३.

**(ङ)** बुधवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पुढे ढकलण्यात आलेला श्री.माणिकराव ठाकरे व इतर वि.प.स. यांचा "**खामगांव (जि.बुलढाणा) तालुक्यात बीएसयुपी व आयएचएसडीपी या योजनेंतर्गत बांधलेल्या घरांचे बांधकाम निकृष्ट**

**दर्जाचे झाल्याबाबत**" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २०५१७.

**(च)** बुधवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पुढे ढकलण्यात आलेला श्री.गुरुमुख जगवानी, वि.प.स. यांचा "**मौजे मागाठाणे (ता.बोरीवली) येथील देवीपाडा गलिच्छ वस्ती झोपडपट्टी पुनर्विकास योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत**" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २२९४४.

**(छ) तारांकित प्रश्न.**

**(ज) तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**महसूल, मदत व पुनर्वसन मंत्री** : "**रेडीरेकनर व स्टँम्प ड्युटीचे वाढलेले दर कमी करण्याबाबत**" या विषयावरील श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३८१८ ला दिनांक १७ मार्च, २०१५ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : उप सभापतींची निवडणूक -**

**(१) श्री.सुजितसिंह ठाकूर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे उप सभापती म्हणून निवड करण्यात यावी."

प्रा.अनिल सोले, वि.प.स. अनुमोदन देतील.

**(२) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे उप सभापती म्हणून निवड करण्यात यावी."

श्री.गिरीशचंद्र व्यास, वि.प.स. अनुमोदन देतील.

**(३) श्री.गोपीकिसन बाजोरिया, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे उप सभापती म्हणून निवड करण्यात यावी."

श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स. अनुमोदन देतील.

**(४) श्री.नारायण राणे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"श्री.माणिकराव ठाकरे, वि.प.स. यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे उप सभापती म्हणून निवड करण्यात यावी."

श्री.दिलीपराव देशमुख, वि.प.स. अनुमोदन देतील.

**(५) श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"श्री.माणिकराव ठाकरे, वि.प.स. यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे उप सभापती म्हणून निवड करण्यात यावी."
श्री.हेमंत टकले, वि.प.स. अनुमोदन देतील.

**(६) प्रा.जोगेन्द्र कवाडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"श्री.माणिकराव ठाकरे, वि.प.स. यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे उप सभापती म्हणून निवड करण्यात यावी."
श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. अनुमोदन देतील.

**(७) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"श्री.माणिकराव ठाकरे, वि.प.स. यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे उप सभापती म्हणून निवड करण्यात यावी."
श्री.संजय दत्त, वि.प.स. अनुमोदन देतील.

**तीन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.**

**(क) मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र सागरी मंडळ यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल व सन २०१२-२०१३ व २०१३-२०१४ या वर्षांचे वार्षिक प्रशासकीय अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख) वित्त मंत्री** :

(१) "भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाचे (१) सामान्य आणि सामाजिक क्षेत्र व (२) स्थानिक संस्था अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) "भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी संपलेल्या वर्षाचा सार्वजनिक उपक्रम अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग) गृहनिर्माण मंत्री** :

(१) "शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांचा सन २००४-२००५ ते २००७-२००८ या वर्षांचा अनुक्रमे सहावा, सातवा, आठवा व नववा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, वांद्रे, मुंबई यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा वार्षिक लेखा आणि लेखा विवरण पत्र" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ) कामगार मंत्री** : **(१)** "महाराष्ट्र मच्छिमार उद्योगातील मच्छिमार आणि इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना, २०१४ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक युडब्ल्यु. २०१४/प्र.क्र.३१३/कामगार-५, दिनांकित ४ ऑगस्ट, २०१४" सभागृहासमोर ठेवतील.

**(२)** "रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, रायगड यांचा सन २००८-२००९ ते २०१०-२०११ या वर्षांचा अनुक्रमे सातवा, आठवा व नववा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३)** "अकोला-वाशिम-बुलडाणा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अकोला यांचा सन २००९-२०१०, २०१०-२०११ व २०११-२०१२ या वर्षांचे अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(४)** "नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक यांचा सन २००९-२०१० ते २०१३-२०१४ या वर्षांचा अनुक्रमे सहावा, सातवा, आठवा,नववा व दहावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(५)** "धातू (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार व दुकाने माथाडी कामगार मंडळ, मुंबई यांचे सन २०१०-२०११ ते २०१२-२०१३ या वर्षांचे अनुक्रमे अडतीसावा, एकोणचाळीसावा व चाळीसावा वार्षिक अहवाल ताळेबंदासह" सभागृहासमोर ठेवतील.

**(६)** "लातूर व उस्मानाबाद जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, लातूर यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा चोवीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(७)** "जालना जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जालना यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा सव्वीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(८)** "नाशिक जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, (लासलगांव) यांचा सन २०१४-२०१५ या

वर्षाचा सव्वीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(९) "नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नाशिक यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा तीसावा लेखा परिक्षण अहवालासह वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

चार : **"लोकलेखा समितीचा तेरावा अहवाल सादर करणे."**

पाच : **"इतर मागासवर्ग कल्याण समितीचा पहिला अहवाल सादर करणे."**

सहा : **"अल्पसंख्याक कल्याण समितीचा दुसरा अहवाल सादर करणे."**

सात : **"निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप."**

आठ : **औचित्याचे मुद्दे - (असल्यास).**

नऊ : **म.वि.प.नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने — असल्यास.**

दहा : **(क) लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

(१) **श्री. धनंजय मुंडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"खेड (जि.पुणे) तालुक्यातील चाकण, आंबेठाण रोड येथील, विकासक राजेंद्र घनवट यांच्यावर चार खोटे गुन्हे दाखल करुन ५० लाख रुपयांची खंडणी घेतल्याप्रकरणी सन २०१३ पासून सीआयडी चौकशी सुरु असताना देखील सदर प्रकरणातील आरोपी तत्कालीन पुणे ग्रामीण पोलीस अधिक्षक, आर्थिक गुन्हे शाखेतील पोलीस निरिक्षक व पोलीस उप अधिक्षक यांना शासनाने बढती दिल्याचा प्रकार निदर्शनास येणे, सदरहू पोलीस अधिकाऱ्यांची एसीबी, सीआयडी आणि विभागीय चौकशीची कार्यवाही दोन वर्षापासून दिरंगाईने सुरु असणे, दिनांक २१ ऑक्टोबर, २०१५ रोजी लोकप्रतिनिधींनी शासनास निवेदन देऊनही यावर कार्यवाही न होणे, यामुळे निरपराध श्री. घनवट यांच्यावर झालेला अन्याय, तसेच खेड, शिक्रापूर, चाकण येथील माजी सैनिक दगडू पानसरे यांचे नावे असलेली गट क्र. ११५३ मधील १६ गुंठे जमीन पोलीस निरिक्षकाची पत्नी व नातेवाईक यांनी संगनमत करुन हडप करणे, सदरहू पोलीस निरिक्षकाच्या पत्नीने शासनाची परवानगी न घेता परस्पर गट क्र. ११५४-५५ मध्ये गृह प्रकल्प राबवून व घरांची विक्री करुन नफेखोरी करणे, सदर प्रकल्पाकरीता रस्ता उपलब्ध होण्यासाठी पानसरे यांची १६ गुंठे जमीनीवर अतिक्रमण करुन हडप केल्याप्रकरणी गेले तीन वर्षापासून पुणे सीआयडी भरारी पथकातर्फे सुरु असलेली सीआयडी चौकशीची कार्यवाही अद्याप पूर्ण न होता दबावामुळे दिरंगाईने सुरु

असणे, याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ एप्रिल, २०१५ रोजी शासनास लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर कार्यवाही न होणे, यामुळे सदरहू पानसरे कुटुंबियांवर अन्याय होवून, त्यांचेवर आलेली बेघर व बेदखल होण्याची वेळ, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, राज्यात जनतेचे रक्षण करणाऱ्या पोलीसांकडूनच खंडणी आणि जमीन हडप करण्याचे गैरप्रकार घडणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री.गोपीकिसन बाजोरीया,** डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, ॲड. अनिल परब, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"वाशिम शहराची सुधारित विकास योजना दिनांक ३० एप्रिल, १९९२ मध्ये मंजूर होवून दिनांक १ जुलै, १९९२ पासून अंमलात आल्यानंतर दिनांक १ जुलै, १९९८ रोजी वाशिम जिल्ह्याची निर्मिती होणे, जिल्ह्याची निर्मिती झाल्यानंतर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अनधिकृतपणे विकास होण्याची शक्यता वर्तविण्यात येणे, त्यातून मार्ग काढण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये एक सर्वंकष फेरबदल प्रस्ताव तयार करण्यासंदर्भात सन २००५ मध्ये वाशिम नगर परिषदेस निर्देश देण्यात येणे, परंतु काही विशिष्ट लोकांनी एमआरटीपी ॲक्टच्या कलम ३७ (१) प्रमाणे गैरमार्गाचा अवलंब करुन जवळपास ३०० ते ४०० एकर जमीन हरित क्षेत्रातून काढून रहिवाशी क्षेत्रात दाखवून सर्व नियमांचे उल्लंघन करुन विकास आराखड्यामध्ये समाविष्ट करुन शासनास सादर करणे, यासंदर्भात दिनांक २२ जुलै, २०१० रोजी विधानपरिषद नियम ९३ अन्वये सूचना उपस्थित करण्यात आली असता त्यावर मा.तत्कालीन मुख्यमंत्री यांनी एक सर्वंकष आराखडयाचा निर्णय होईपर्यंत कलम ३७(१) अन्वये सादर केलेले प्रस्ताव विचारात घेण्यात येणार नाही असे आश्वासन दिलेले असतानांही सदर आश्वासनाला केराची टोपली दाखवून अधिकाऱ्यांशी संगनमत करुन काही विशिष्ट लोकांनी जवळपास ४०० एकर जागा हरित क्षेत्रामधून काढून शहराच्या विकासाचा केलेला बोजवारा, सदर प्रक्रियेदरम्यान काही ठराविक लोकांचे आरक्षण गैरकायदेशीररित्या काढण्यात येणे व सर्वसामान्यांच्या जागेवर आरक्षण टाकण्यात येणे, तत्कालिन मुख्यमंत्री व तत्कालिन राज्यमंत्र्यांनी स्थगनादेश देऊनसुध्दा वाशिम शहरातील अनेक आरक्षणे काढून टाकण्याची तसेच बदल करण्याची प्रक्रिया सुरुच

ठेवण्यात येणे, शासनाने एक सर्वंकष आराखडा तयार करण्याचा आदेश पारित केल्यानंतर तसेच ३७/२ ची कारवाई करुनही १०० ते २०० एकराचे क्षेत्र हे रहिवाशी क्षेत्रात मंजूर करण्यात आल्याचे उघडकीस येणे, संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी विकास आराखडा तयार करतांना जागेवर न जाता व कोणत्याही प्रकारचे सर्वेक्षण न करता, मुळ जागा मालकांशी चर्चा-विनिमय न करता परस्पर एका बंद खोलीत बसून आपआपसात चर्चा करुन घाईघाईने विकास आराखडा तयार करुन दिनांक २७ मे, २०१४ रोजी नगरपरिषदेकडे सादर करणे, वास्तविक विकास आराखडा प्रसिध्द करण्याकरिता मुदत ही दिनांक ३० मे, २०१४ असल्यामुळे विकास आराखडा हा १५ दिवस आधी नगरपरिषदेला सादर करणे गरजेचे असणे परंतु तसे न करता घाईघाईने मुदतीच्या ४ दिवस आधीच विकास आराखडा सादर करणे, तसेच सदर विकास आराखडा तयार करतांना स्थानिक नगरसेवक तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेला विश्वासात घेऊन विकास आराखडा तयार करणे आवश्यक असतांनाही त्यांना डावलून अधिकाऱ्यांनी घेतलेला निर्णय, अधिकाऱ्यांनी अनेक खाजगी जागा सरकारी दाखवून त्यावर आरक्षण ठेवण्यात आल्यामुळे शहरात प्रचंड संतापाचे वातावरण पसरलेले असणे, अधिकाऱ्यांनी मनमानीपणे व घाईघाईने प्रसिध्द केलेला विकास आराखडा रद्द करुन फेरनिर्णय होण्याची आवश्यकता, याकरिता सदरहू वाशिम शहराचा विकास आराखडा तात्काळ पुनश्च: नव्याने तयार करण्याची नितांत आवश्कयता, याबाबत शासनाने त्वरीत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(३) **ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत रस्त्याची निष्कृष्ट दर्जाची कामे करुन आर्थिक घोटाळा केल्याप्रकरणी अनुक्रमे १) रेलकॉन, २) आर.पी. शहा इन्फ्रा, ३) मेसर्स महावीर कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर, ४) आर. के. मे. सुप्रिमो, ५) मे. आर.के.मदानी, ६) जे. कुमार या ६ कंत्राटदारांसह अन्य कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याची बृहन्मुंबई महानगरपालिकेने केलेली कारवाई, तथापि, याच ठेकेदारांना ठाणे महानगरपालिकेने कामांची कंत्राटे दिल्याचे

नुकतेच निदर्शनास येणे, परिणामी या कंत्राटदारांमार्फत देखील ठाणे महानगरपालिकेच्या कामात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर आर्थिक घोटाळा घडण्याची शक्यता, त्यामुळे सदर काळ्या यादीतील ठेकेदारांना ठाणे महानगरपालिकेची कामे देण्यात येवू नयेत अथवा त्यांच्यामार्फत चालू असलेली कामे रद्द करावीत असा ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने ठराव केला असल्याचे दिनांक २० जून, २०१६ रोजी निदर्शनास येणे, त्यामुळे या केलेल्या व चालू असलेल्या कामांची चौकशी व तपासणी करण्यासाठी ४ सदस्यांची समिती नेमण्याची ठाणे महानगरपालिकेवर आलेली पाळी, तथापि सदर समिती नेमून याबाबत अद्याप कार्यवाही न होणे, त्यामुळे ठाणे शहरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व चिडीची भावना व त्याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **ॲड. राहुल नार्वेकर,** सर्वश्री. आनंद ठाकूर, किरण पावसकर, नरेंद्र पाटील, ख्वाजा बेग, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई महानगरपालिकेने एमसीजीएम रेझुलेशन ठराव क्र.४७०, दिनांक १७ ऑगस्ट, २०११ च्या अनुषंगाने नवीन पे अँन्ड पार्क पॉलिसी लागू करणे, सदर पॉलिसीच्या आधारे १२ पार्किंग स्थळांपैकी ५० टक्के महिला बचत गटांसाठी राखीव ठेवण्यात येणे, २५ टक्के सांस्कृतिक संघटनांसाठी व सुशिक्षित बेरोजगारांसाठी आरक्षित ठेवण्यात येणे, सदर पॉलिसीला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात येणे, सन २०१६ साली सदर याचिकेचा निकाल मा.उच्च न्यायालयात दिनांक १३/७/२०१६ रोजी जाहिर करण्यांत येणे, सदर पॉलिसी ग्राह्य व योग्य असल्याचे ठरविण्यात येणे, मुंबई मनपामध्ये मोठ्या प्रमाणात पे ॲन्ड पार्क संबंधात होणारा भ्रष्टाचार, मे.राज इंटरप्रायजेस, मे.प्लाईंग टोल मेटल, मे.ग्लोबल पावर सिस्टम या तीन ठेकेदारांनी सुमारे ४.५ कोटी इतकी रक्कम लायसन्स फी व व्याजाची थकबाकी असतानाही मनपाने त्यांनाच पुन:श्च माहे जानेवारी, २०१६ मध्ये पे ॲन्ड पार्कचा ठेका देणे, सदर ठेकेदारांनी दिलेले धनादेश न वटणे, मनपाने सन २०१६ मध्ये गुन्ह्याबद्दल कोणतीही कारवाई न करणे, मनपातील अधिकारी यांचे हितसंबंध असलेल्या ठेकेदारांनी संगनमताने मनपाचे कोट्यावधी रुपयांचे केलेले नुकसान, सदर भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करुन संबंधित ठेकेदार व मनपा अधिकारी यांच्यावर तात्काळ कारवाई करण्याची गरज, याबाबत

शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री. जयवंतराव जाधव,** नरेंद्र पाटील, किरण पावसकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नगर परिषद, गेवराई (जि.बीड) च्या नविन प्रशासकीय इमारत बांधकामात कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार होणे, शासन निधीतून बांधण्यात आलेला भव्य हुतात्मा स्मृतीस्तंभ नगर पालिकेने शासनाची पूर्व परवानगी न घेता पाडल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरणे, पालिकेच्या विद्यमान नगरसेवकांचे शासकीय जमीनींवर अतिक्रमण असणे, शाळेच्या जागेवर अतिक्रमण करणाऱ्या बिअरबार, परमिट धारकांना नगर परिषदेने संगनमत करुन ना हरकत परवाने देणे, शहरातून जाणाऱ्या महामार्गात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झालेले असतानाही पालिकेने अतिक्रमण धारकांना अवैधरितीने व्यावसायिक परवाने अदा करणे, बोगस रस्त्यांची कोट्यवधी रुपयांची देयके कंत्राटदारांना अदा करुन या बाबतच्या संचिका कार्यालयातून गहाळ करणे, कुटुंबातील वेगवेगळ्या व्यक्तिंच्या नावे बोगस शौचालये बांधल्याचे दाखवून लाखो रुपयांचा अपहार करणे, शहरातील स्वच्छता आणि बाजारतळ कर वसुलीच्या कंत्राटात मोठ्या प्रमाणात अपहार होणे, व्यापारी गाळे, बांधकाम आणि त्यांचे लिलाव करताना कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार होणे, वारंवार तक्रारी दाखल करुनही चौकशीकामी झालेली अक्षम्य दिरंगाई, चौकशी अधिकाऱ्यांनी दोषींशी संगनमत करुन अहवालात स्वयंस्पष्ट अभिप्राय न दिल्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांविरुध्द कोणतीही कारवाई न होणे, जनसामान्यांना मिळणाऱ्या असुविधा आणि भ्रष्ट कारभारामुळे सर्वसामान्य जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, या गंभीर बाबींकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील खार (पश्चिम) येथील जनता चाळ रहिवाशी सेवा संघ आंबेडकर रोड येथील झोपड्या १९८७ साली मुंबई महानगरपालिका एच (प.) विभाग बांद्रा यांनी १९८७ साली निष्कासित केले असल्याचे निदर्शनास येणे, जनता चाळ रहिवासी सेवा संघ यांच्या सभासदांनी मुंबई महानगरपालिकेकडे पर्यायी जागा मिळावी म्हणून अनेक वर्ष पत्र व्यवहार करूनही त्यांना न्याय मिळालेला नसणे, सन १९९३ मध्ये

या झोपडीधारकांचे पूर्वीच्याच ठिकाणी पुनर्वसन करण्याचे महानगरपालिकेचे आदेश असतानाही त्याबाबतीत अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही न होणे, सदर झोपडीधारकांची नावे सन १९८३ – १९८५ च्या विधानसभा मतदार यादीत समाविष्ट असल्याचे समजणे, यावरुन सदर झोपडीधारकांचे त्या ठिकाणचे १९८५ पूर्वीपासूनचे वास्तव्य असल्याचे सिद्ध होणे, जनता चाळ रहिवासी सेवा संघ यांच्या सभासदांनी सदर झोपड्या निष्कासित झाल्यापासून न्यायासाठी सतत प्रयत्न करूनही महानगरपालिकेकडून कुठल्याच प्रकारची कार्यवाही न होणे, याबाबत शासनाकडून सखोल चौकशी करून कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **सर्वश्री. हेमंत टकले,** किरण पावसकर, नरेंद्र पाटील, अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"आखाती राष्ट्रांसह अमेरिका, फ्रान्सलाही घातपाती कारवायांनी हादरवून सोडणाऱ्या इसिस ने महाराष्ट्रातही मोठा घातपात करण्याचा रचलेला डाव, औरंगाबाद आणि नांदेडच्या दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) उधळून लावणे, घातपात घडविण्यासाठी स्फोटकांची जुळवाजुळव करणारा इसिसचा एजंट नासेरबीन अबुबकर याफई उर्फ चाऊस याला नुकतीच दिनांक १५ जुलै, २०१६ रोजी रात्रीच्या सुमारास परभणीतून अटक करण्यात आलेली असणे, आरोपी नासेरबीन हा इसिसचा समर्थक असून, इसिसने नासेरबीनच्या माध्यमातून राज्यात मोठा घातपात घडविण्याची तयारी सुरु केली होती असे प्राथमिक तपासात समोर आले असणे, तसेच इसिसमध्ये राज्यातील तरुणांना भरती करण्याचाही तो प्रयत्न करत असल्याचे उघड होणे, त्यामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती याबाबत जनतेत पसरलेले कमालीचे भितीचे वातावरण, याबाबत शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया."

(८) **श्री. धनंजय मुंडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"माणगांव तालुक्यातील अशोकदादा साबळे माध्यमिक विद्यालय या शाळेतील शिक्षक अतिरिक्त ठरविण्यात येणे, याच विद्यालयात तीन शिक्षिकांना अतिरिक्त ठरवून त्यांची सेवा ज्येष्ठता नियमबाह्य रित्या मागे पुढे करण्यात येणे, यासंदर्भात स्थानिक

लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री शालेय शिक्षण यांच्याकडे एका बैठकीचे आयोजन करणे, सदरच्या बैठकीत सेवा ज्येष्ठता, उच्च शिक्षण नोंदी, पदवी प्रमाणपत्र नोंदी या मध्ये अनियमितता झाल्याचे स्पष्ट होणे, विद्यालयात अध्यापनाचे काम करणाऱ्या शिक्षिकांनी त्याच उच्च माध्यमिक विद्यालयात पदवी पूर्ण करण्यासाठी प्रवेश घेणे, अध्यापन व शिक्षण हे एकाच माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पूर्ण केलेले असणे, पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पदवी प्रमाणपत्राच्या मूळ नोंदी सेवा पुस्तीकेवर घेण्याविषयी संस्था चालक, मुख्याध्यापक यांनी टाळाटाळ करणे, दरम्यानच्या काळात काही शिक्षक अतिरिक्त होणे, अतिरिक्त शिक्षक ठरवत्यावेळी संस्थेने त्याच संस्थेत कार्यरत असणाऱ्या संस्था चालकांच्या नातेवाईकांना फायदा होण्यासाठी २००८ च्या ज्येष्ठता सूची मध्ये फेरफार करणे, दोन कनिष्ठ सहाय्यक शिक्षिका यांना सेवा ज्येष्ठता सूचीमध्ये वरच्या क्रमांकावर दर्शवणे, त्यामुळे इतर महिला शिक्षिकांवर अन्याय होणे यासाठी शासनामार्फत वेळोवेळी आदेश देण्यात येवूनसुद्धा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, रायगड यांनी हेतूपुर:सर टाळाटाळ करणे, सदरच्या प्रकरणात आर्थिक देवाण-घेवाण होऊन शिक्षणाधिकारी (माध्यमिक), यांच्याकडून सेवा ज्येष्ठता सूचीत फेरफार करण्यात येणे, त्यामुळे शिक्षकांमध्ये पसरलेले भीतीचे वातावरण, आर्थिक देवाण-घेवाणीसाठी काही शिक्षिकांना अतिरिक्त ठरविण्यात आल्याने पसरलेला तीव्र असंतोष, अद्यापही शासनाने या प्रकरणी चौकशी न केल्याने निर्माण झालेली चिडीची भावना, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची भूमिका."

(९) **डॉ. सुधीर तांबे**, डॉ. अपूर्व हिरे, सर्वश्री. रामनाथ मोते, नागो गाणार, प्रा. अनिल सोले, सर्वश्री. गिरीशचंद्र व्यास, मितेश भांगडिया, श्रीकांत देशपांडे, अशोक ऊर्फ भाई जगताप, संजय दत्त **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील शासकीय, निमशासकीय सेवेत दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर आलेल्या सर्व कर्मचारी यांना तसेच १०० टक्के अनुदान सन २००५ नंतर प्राप्त झालेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी मा.लोकप्रतिनिधी यांनी संबंधितांकडे वारंवार मागणी करणे, नवीन पेन्शन योजनेत कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटूंबियांना सुरक्षितता नसणे, नवीन योजनेत वारसाना अनुकंप तत्वाचा लाभ वा भविष्यनिर्वाह निधी काढण्याची तरतुद नसणे, नवीन परिभाषित

अशंदान पेन्शन योजना ही अन्याय कारक असल्याने ती रद्द करण्याची आग्रही मागणी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेकडून केली जाणे, त्याचप्रमाणे सर्व कर्मचारी यांनी राज्यभर आंदोलने करुनही त्यांना अद्यापही जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आली नसल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या सुमारास आढळून येणे, यामुळे या सर्व कर्मचारी वर्गामध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, सन २००५ नंतर सेवेत आलेल्या सर्व शासकीय व निमशासकीय कर्मचारी यांना त्याचप्रमाणे १०० टक्के अनुदान सन २००५ नंतर प्राप्त झालेल्या सर्व शिक्षकांना जुनी पेन्शन योजना देण्याची असलेली नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१०) **आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई शहरातील १९४० पूर्वीच्या इमारती मोडकळीस येणे, मालक भाडेकरु यांना डागडुजी, पुर्बांधणी न परवडणे यासाठी अश्या इमारतींना म्हाडाची २.५ ते ३ चटईक्षेत्र [FSI] देवून परवानगी देणे, यामध्ये विकासकांनी गैरफायदा घेणे, भोगवाटा पत्र (ओसी) मिळण्यापूर्वीच रहिवाश्यांनी पर्यायी भाडे बंद करुन फ्लॅटचा ताबा घेण्यास विकासकाकडून भाग पडणे, दरम्यान मुंबईतील एका न्यायालयाकडून सर्व गैरप्रकारांची दखल घेऊन महापालिका अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश होणे, विकासकांवर सरकारकडून कुठलीही कारवाई न होणे, यामुळे जनतेत नाराजी निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(११) **प्रा. जोगेन्द्र कवाडे,** सर्वश्री. रामहरी रुपनवर, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नाशिक व विरारमधील आपल्या गृहनिर्माण प्रकल्पाच्या जाहिरातीमध्ये म्हाडाच्या नावाचा विनापरवानगी व अनावश्यक उल्लेख केल्याबद्दल म्हाडाने "एकता वर्ल्ड" या खाजगी बिल्डर कंपनीला तसेच एक अभिनेता यांना कायदेशीर नोटीस बजावली असल्याचे माहे जुलै, २०१६ दरम्यान निदर्शनास येणे, एकता लकी होम या योजनेत ८५० भाग्यवान विजेत्यांना एकता वर्ल्ड च्या प्रकल्पातील घरे म्हाडाच्या किंमतीपेक्षा कमी किंमतीत अशा आशयाची जाहिरात कंपनीने मागच्या महिन्यात वृत्तपत्रात व दूर चित्र

वाहिन्यांवर दिली असणे, या जाहीरातीमुळे आजपर्यंत ६५ लाख कुटुंबाना परवडणारी घरे पुरविलेल्या म्हाडाची प्रतिमा मलिन झाली असणे, परंतु शासनाने ही जाहीरात करणाऱ्यांना फक्त नोटीस पाठविली असून कठोर कारवाई करण्याबाबत केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना त्यामुळे शासनाने ही जाहीरात करणाऱ्या कंपनीवर अब्रू नुकसानीचा दावा करण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१२) **श्री. ख्वाजा बेग वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी तालुक्यातील सुकळी गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत शेती न करण्याचा सामुहीक निर्णय घेवून त्याबाबतचे लेखी निवेदन तहसिलदारांमार्फत प्रशासनास दिनांक ४ एप्रिल रोजी देणे, याच जिल्ह्यातील नेर तालुक्यातील सातेफळ येथील शेतकऱ्यांनी शेती न करण्याचे निर्णय घेतल्याचे प्रशासनास दिनांक १४ मार्च, २०१६ रोजी निवेदनाद्वारे कळविणे, त्याचप्रमाणे वाशीम जिल्ह्यातील जामदरा ता.मानोरा येथील शेतकऱ्यांनी सुध्दा दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ रोजी असाच निर्णय घेवून प्रशासनास लेखी निवेदनाद्वारे ग्रामपंचायतचा ठराव घेवून कळविणे, शेतकरी इतक्या विवंचनेत असताना त्यांच्या परिस्थितीची साधी विचारपूस शासनाकडून करण्यात आलेली नसणे, पिकविम्याच्या बाबतीतही गोंधळ असणे, आर्णी तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांनी दिनांक १३ जून, २०१६ रोजी आंदोलन करत पिकविम्याचा लाभ देण्याबाबत तहसिल प्रशासनामार्फत सरकारला निवेदन करुनही त्याबाबत सरकारने कुठलीही ठोस पावले न उचलणे, याबाबत शासनाकडून कोणतीही दखल घेण्यात येत आली नसल्याने काही सामाजिक संघटनांकडून सदर शेतकऱ्यांना त्यांच्या परिने मदत करण्यात येणे, एकप्रकारे या शेतकऱ्यांची शासनाने दखल न घेतल्याचे चित्र उभे राहणे, परिणामी शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोषाची भावना निर्माण झाली असुन शासनाने आपली एक प्रकारे थट्टा केल्याची परिस्थिती सर्व शेतकरी व जनमानसात निर्माण होणे, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१३) **श्री. नारायण राणे वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **पर्यावरण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अंबरनाथ-डोंबिवली एमआयडीसीमधील जवळपास १४२

कंपन्या तडकाफडकी बंद करण्याचे आदेश महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिल्याची धक्कादायक बाब माहे जुलै, २०१६ मध्ये उघडकीस येणे, सदर निर्णयामुळे या कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या हजारो कामगारांवर बेरोजगारी व उपासमारीची वेळ येणे, कारखान्यांच्या रासायनिक सांडपाण्यावर होणाऱ्या प्रक्रियेत ऑक्सीजनचे कमी झालेले प्रमाण सुधारण्याकरीता वारंवार तक्रार देऊनही त्यावर कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी सांडपाणी प्रक्रिया केंद्र बंद करण्याची वेळ येऊन त्या धोक्यास्तव कारखानेच बंद करण्याचा घेतलेला दुर्देवी निर्णय, याऊलट मुंबईतील माहूलगाव व आंबापाडा यांच्या मधोमध असणाऱ्या सिलॉर्ड कन्टेनर्स या कंपनीतील केमिकलमधील विषारी वायू हवेत मिसळल्याने गेल्या पाच वर्षात तेथील अनेक स्थानिक रहिवाश्यांचे मृत्यू होणे, या केमिकल कंपनीमुळे कॅन्सर, त्वचारोग, लहान मुलांचे डोळ्यांचे विकार इत्यादी रोगांपासून स्थानिक ग्रामस्थ वर्षोनुवर्षे पिडीत असून वारंवार तक्रार विरोध असताना व राष्ट्रीय हरित लवादाने ठपका ठेवूनदेखील अद्यापपर्यंत कंपनीवर कोणतीही कारवाई न होणे, त्यामुळे दोन्ही प्रकरणांमध्ये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची भिन्न वागणूक, त्यामुळे हजारो कामगारांच्या तसेच स्थानिक रहिवाशांच्या मनात वाढलेली संतापाची भावना, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१४) **सर्वश्री. किरण पावसकर,** शरद रणपिसे, नरेंद्र पाटील, हेमंत टकले, ख्वाजा बेग, अॅड. राहुल नार्वेकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"खंबाटा एव्हिऐशन प्रा.लि.कंपनी, २०८ अॅस्कॉट सेंटर, आयटीसी ग्रँट मराठा हॉटेल समोर, सहार रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ही कंपनी सुमारे ४० वर्षापासून सुरु असणे, त्यात सुमारे २१०० कामगार कार्यरत असणे, कंपनीमार्फत एअरपोर्ट विभागात विविध सेवा पुरविण्यात येत असणे, गेल्या काही वर्षापासून कंपनी राबवित असलेले कामगार विरोधी धोरण, सुमारे २ ते ३ वर्षापासून कंपनीतील बहुसंख्य कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रकमा, एल.आय.सी.चा सहाय्य भत्ता, कामगारांच्या क्रेडिट सोसायटीचे वसूल करण्यात आलेले हप्ते, रजा सेवा सवलत, बोनस इत्यादी आर्थिक बाबींमध्ये मोठ्या प्रमाणात होत असलेली अनियमितता व गैरव्यवहार, कामगारांना सदरच्या आर्थिक लाभांपासून वंचित ठेवण्याची होत असलेली कृती, सेवानिवृत्त कामगारांची देय देणी

देण्यास होणारा विलंब व काही प्रकरणी असणारा नकार, कामगारांचे वेतन वेळीच अदा न करण्याकडे असलेला कंपनीचा कल, कामगारांनी लक्ष वेधून न्याय मिळावा यासाठी अनेकवेळा केलेली आंदोलने, मात्र त्यांना कोणताही प्रतिसाद न मिळणे, त्यांची सुरु असलेली पिळवणूक, कंपनीची आर्थिक स्थिती चांगली असतानाही कंपनी तोट्यात असल्याचे भासवून कंपनी बंद करण्याचा सुरु असलेला प्रयत्न, कामगारांवर ओढवलेले उपासमारीचे संकट, त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष, त्यांना न्याय व दिलासा मिळावा यासाठी शासनाने याप्रकरणी लक्ष घालून कार्यवाही करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१५) **श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील असंघटीत व असंरक्षित कामगारांना संघटीत करण्यासाठी व विविध सेवासुविधा पुरविण्यासाठी शासनाने सन १९६९ साली विविध माथाडी कामगार मंडळांची स्थापना केलेली असणे, त्यापैकी महाराष्ट्र राज्य माथाडी सल्लागार मंडळ, महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक सल्लागार मंडळ, माथाडी मंडळे, माथाडी मंडळातील कर्मचारी वर्ग अशा अनेक मंडळातील अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झालेले असून त्यांची पदे १० वर्षापासून रिक्त असणे व ती रिक्त पदे भरण्यास शासनाचेही अक्षम्य दुर्लक्ष झालेले असणे, त्यामुळे सर्वसामान्य कामगारांकरिता असणाऱ्या या कामगार मंडळातील कामे होण्यास होत असलेला विलंब आणि बहुतांश मंडळावर कित्येक वर्षे अध्यक्षांची नेमणूकच झाली नसल्याने सदर मंडळाचे धोक्यात आलेले भवितव्य व रिक्त पदे न भरल्याने मंडळातील कामगारांच्या कामात येणारे व्यत्यय, परिणामी मंडळातील कर्मचारी वर्ग आणि नोंदीत कामगारांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(ख) लक्षवेधी सूचनेवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे - (जोडपत्र पहावे.)**

**अकरा : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

## - मध्यंतर -

**बारा : शासकीय विधेयके —**

(क) **विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

(१) **"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २६ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१६"**

(अ) **विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २६ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १२ सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ब) **विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.प्रकाश गजभिये, शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २६ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १० सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) **"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३२ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विधेयक, २०१६"**

(अ) **विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३२ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १२ सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ब) **विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद**

**रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३२ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १० सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---------------------------------------------------------------

(३) **"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २८ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २८ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १० सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---------------------------------------------------------------

(४) **"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ४० - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (चौथी सुधारणा) विधेयक, २०१६"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ४० - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (चौथी सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १० सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---------------------------------------------------------------

(५) **"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २४ - महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन)(सुधारणा) विधेयक, २०१६"**

(अ) **विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २४ - महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन)(सुधारणा) विधेयक,

२०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १२ सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ब) **विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २४ - महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन)(सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या १० सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(क) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २४ - महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन)(सुधारणा) विधेयक, २०१६ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(ख) **विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विधेयक विचारात घेणे.**

**"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३९ - महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक, २०१६"**

---

**तेरा : (गुरुवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

(क) **सर्वश्री. माणिकराव ठाकरे,** धनंजय मुंडे, शरद रणपिसे, सुनिल तटकरे, नारायण राणे, हेमंत टकले, संजय दत्त, जयंत पाटील, सुभाष झांबड, सतिश चव्हाण, अशोक ऊर्फ भाई जगताप, रामराव वडकुते, ॲड.रामहरी रुपनवर, सर्वश्री. प्रकाश गजभिये, चंद्रकांत रघुवंशी, जयवंतराव जाधव, प्रा.जोगेन्द्र कवाडे, सर्वश्री.संदिप बाजोरिया, अब्दुल्लाखान दुर्राणी, आनंदराव पाटील, विक्रम काळे, अमरनाथ राजूरकर, अनिल भोसले, सतेज ऊर्फ बंटी पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.नरेंद्र पाटील, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री. अनिल तटकरे, हरिसिंग राठोड, ख्वाजा बेग, जगन्नाथ शिंदे,

**वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव - (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)** -

"राज्यात ३ ते ४ वर्षापासून अनियमित पावसामुळे महाराष्ट्रातील विशेषत: विदर्भ, मराठवाडा व महाराष्ट्रातील अन्य दुष्काळी भागात होत असलेली सततची नापीकी, तसेच शेतमालाला भाव न मिळणे, यामुळे शेतकऱ्यांची खालावलेली आर्थिक स्थिती, परिणामी मोठ्या प्रमाणात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या, यावर्षी खरीप हंगामात आर्थिक दृष्ट्या शेतकरी प्रचंड अडचणीत सापडणे, या परिस्थितीत बँकांना पुनर्गठनाचे शासनाने सूचित करुनही शेतकऱ्यांना कर्ज न मिळणे, मोठ्या प्रमाणात शेतकरी कर्जापासून वंचित असणे, शेतकऱ्यांनी काढलेल्या विम्याचा पुरेसा लाभ न होणे, ५० टक्क्यापेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावांना शासनाने मदत जाहिर करुनही आर्थिक मदत न मिळणे, त्यातच विमा कंपन्यानी प्रिमियमचे वाढविलेले दर, विम्याच्या प्रिमियममधून अल्पभूधारकांना सवलती पासून वंचित ठेवणे, चालू वर्षी खरीप हंगामाकरिता बियाणांचा तुटवडा, वाढलेले दर त्यातच अनेक कंपन्यानी निकृष्ट दर्जाच्या बियाणांची केलेली विक्री, चालू हंगामात विम्याची रक्कम भरण्याची अंतिम मुदत ३१ जुलै पर्यंत असल्याने ती वाढविण्याची असलेली गरज, या सर्व परिस्थितीमुळे शेतकऱ्यांची खालावलेली आर्थिक परिस्थिती पाहता व शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे वाढलेले प्रमाण लक्षात घेता राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्ज माफी याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(ख)** **श्री.सुजितसिंह ठाकूर,** डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, सर्वश्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, गोपीकिसन बाजोरिया, विनायक मेटे, प्रा.अनिल सोले, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती स्मिता वाघ, सर्वश्री.प्रशांत परिचारक, गुरुमख जगवानी, गिरीश व्यास, रामनाथ मोते, ॲड.अनिल परब, श्री.रविंद्र फाटक, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यात सुरू असलेली रोजगार हमी योजना संपूर्ण देशात महाराष्ट्र राज्याने प्रथम स्वीकार केली असणे, आपल्या राज्यात सदरहू योजना लोकाभिमुख व विकासाभिमुख झाल्यानंतर अशीच योजना नरेगाच्या माध्यमातून केंद्र शासनाने सर्व देशभरात लागू केली असणे, संबंधित अधिनियमाचा लाभ घेत देशातील विविध राज्यांनी या योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात विकास केला असल्याचे निदर्शनास येणे, महाराष्ट्र राज्यात मात्र ही योजना संथ गतीने सुरू असल्याचे निदर्शनास येणे, विधानमंडळाच्या रोजगार हमी योजना समितीने सदर योजना राज्यभरात प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने अन्य राज्यांचे अभ्यास दौरे करुन व त्यांच्याकडील या योजनेचा अभ्यास करुन त्या धर्तीवर आपल्या राज्यात ही योजना अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न केला

असणे, तथापि शेतकरी व मजुरांच्या रोजगाराचा प्रश्न सोडविणाऱ्या या योजनेस शासनाचे काही उच्च पदस्थ अधिकारी, ग्रामसेवक, तांत्रिक अधिकारी यांच्याकडून आवश्यक ते सहकार्य मिळत नसल्याचे निदर्शनास येणे, परिणामी अपेक्षेप्रमाणे या योजनेंतर्गत कामे होत नसल्याचे निदर्शनास येणे, राज्याच्या महात्मा गांधी रोजगार हमी योजनेस केंद्राकडून निधी उपलब्ध होत असूनही इतर राज्यांच्या तुलनेत तो खर्च होत नसल्याचे निदर्शनास येणे, सन १९९९ ते २०१० या कालावधीत राज्यात सुरू असलेल्या लॉटरीच्या माध्यमातून शासनास अपेक्षित महसूल मिळाला नसल्याची बाब निदर्शनास येणे, त्या कालावधीतील कर व इतर माध्यमातून हजारो कोटी रुपयांचे येणे आजही बाकी असल्याचे निदर्शनास येणे, विद्यमान वित्त व नियोजन मंत्र्यानी पेपरलेस प्रशासन चालविण्याच्या दृष्टीने सुरू केलेली प्रक्रिया, गतीमान प्रशासनासाठी सदर प्रक्रिया अधिक प्रभावी करण्याची आवश्यकता, राज्याच्या डोंगरी भागातील पिण्याच्या पाण्याची टंचाई, याबाबत शासनाची भूमिका व करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## — अशासकीय कामकाज —

## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**चौदा : अशासकीय ठराव :-**

**(१) (शुक्रवार, दिनांक २२ जुलै, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला अशासकीय ठराव) —**

**श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ८६ — (मंत्र्यांचे उत्तर)-**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकांसारख्या आर्थिक संस्थाकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तिला रोजगार मिळविण्याच्यादृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी व सुशिक्षित बेरोजगारांना पुन्हा भत्ता सुरू करावा, रोजगारासाठी भागभांडवलाची सोय करावी व बंदी घालण्यात आलेली नोकर भरती पुन्हा सुरू करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(शुक्रवार, दिनांक २२ जुलै, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले अशासकीय ठराव) —**

**(बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार हे ठराव दाखविण्यात आले आहेत) -**

**(२) श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १४२**

"राज्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम आणि शिस्त निर्माण व्हावी यादृष्टीने

राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयात एन.सी.सी. चा अभ्यासक्रम किंवा त्या धर्तीवर एम.सी.सी. चा अभ्यासक्रम अनिवार्य करावा व प्रत्येक शाळा, महाविद्यालयात त्याचे शिक्षण सर्व विद्यार्थ्यांना अनिवार्य करावे, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे."

(३) **श्रीमती. हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १००**

"राज्यात विशेषतः ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी हजारो किलोमीटर लांबीचे बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी शेतजमिनीत शिरुन शेतीच्या मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणांची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे मोठया प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरुपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या पाचही जिल्ह्यांच्या गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबध्द व कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४) **प्रा.अनिल सोले, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ३४**

"राज्यात विशेषतः विदर्भातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जागा मोठया प्रमाणात रिक्त असून, त्यात काही उद्योजकांनी जागा खरेदी करुन तेथे कोणताही उद्योग सुरू न करणे, त्या एम.आय.डी.सी. ची दुरवस्था निर्माण होणे, केवळ ५० टक्के जागेची विक्री होणे, त्यातही काहीच उद्योग सुरू होणे, तसेच नागपूर विभागात २६८७ उद्योग सुरू असून त्यातून केवळ ०.७१ हजार एवढाच रोजगार उपलब्ध होणे, अमरावती विभागात १५८९ उद्योग सुरू असून त्यातून केवळ ०.१९ हजार रोजगार उपलब्ध होणे, तसेच बुटीबोरी (नागपूर विभाग) या पंचतारांकित औद्योगिक वसाहतीत १९९९ पासून नवीन उद्योग येणे बंद होणे, तसेच बुटीबोरी येथील निवासी भूखंडाची एकूण ५३,५३६ चौ.मीटर जागेची अतिरिक्त मागणी माहे एप्रिल, २०११ ला प्रस्ताव पाठवूनही परवानगी न मिळणे, वर्धा एम.आय.डी.सी.तील ५० टक्के जागेत उद्योजकांनी जागा घेवूनही १० टक्के उद्योग अद्याप सुरू न होणे, ३ टक्के उद्योजकांनी केवळ निवासी बंगले बांधून जागेचा केलेला गैरव्यवहार, परिणामी बेरोजगारांना रोजगार मिळेल हा शासनाचा उद्देश सफल न होणे, या सर्व बाबींचा आढावा घेऊन यावर कायमस्वरुपी ठोस उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

## राष्ट्रगीत.

**<u>असुधारित प्रत</u>**

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : ४ ऑगस्ट, २०१६.**

**उत्तमसिंग चव्हाण,**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**